जा.क्र.पोआ/नमुं/आस्था-२/तात्पुरती (Prov.)सेवाजेष्ठता यादी/सन २०२०/सपोफौ ते पोशि/४५७८/२०२१,
पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यालय,सी.बी.डी.बेलापुर, सेक्टर नंबर-१०,रिझर्व्ह बँकेसमोर,
नवी मुंबई -४०० ६१४ , ०२२-२७५६११२९, ०२२-२७५७४९२९,

नवी मुंबई

establishmentbr-nm@mahapolice.gov.in , दिनांक :-३०/०८/२०२१.

**विषय :- दिनांक ०१-०१-२०२० ते दिनांक ३१-१२-२०२० या कालावधीतील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांची एकत्रित तात्पुरती (Provisional) स्वरुपातील सेवाजेष्ठता सुची प्रसिद्ध करणेबाबत.**

----ooo----

**आ दे श :-**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/२०१२, दिनांक २१-१०-२०११, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.३३९/१२, मध्ये २६-०२-२०१४ रोजी दिलेल्या न्यायनिवाड्यानुसार तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१/बारा, दिनांक २१-०६-२०२१ मधील तरतुदींनुसार **नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या सवंर्गाची दिनांक ०१-०१-२०२० ते दिनांक ३१-१२-२०२० या कालावधीतील एकत्रित तात्पुरत्या (Provisional) स्वरुपातील सेवाजेष्ठतासुची याद्वारे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या www.navimumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

सदरची तात्पुरती **(Provisional)** सेवाजेष्ठतासुची संदर्भीय शासन तरतुदीनुसार तयार करण्यात येवुन खालीलप्रमाणे निकष लावण्यात आलेले आहेत.

१) पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अंमलदारांचे त्यांचे भरती वर्ष ग्राह्य धरण्यात आलेले आहे.

२) दिनांक १९-११-१९९४ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची स्थापना होणेपूर्वी या घटकात कार्यरत असलेले व तत्पुर्वी आंतरजिल्हा बदलीवर हजर झालेले व पोलीस आयुक्तालय स्थापनेवेळी तसेच सन १९९८ पर्यत वर्ग झालेले अंमलदार आणि सन २००६ साली रायगड जिल्ह्यातुन वर्ग झालेले अंमलदार यांना त्यांच्या भरती दिनांकाप्रमाणे सेवाजेष्ठ समजण्यात आलेले आहे.

३) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.-संकीर्ण-२०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल५-ब दिनांक २६-१०-२०१७ अन्वेय निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार "महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील

**(कृ.मा.प.)**

पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (रा.रा.पो.बल गटातील कर्मचारी वगळता) दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक आस्थापना बदली नियमावली मधील नियम ५ नुसार आंतरजिल्हा बदलीवरील कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता पोलीस शिपाई पदावरील भरती दिनांक ग्राह्य धरण्यात येवुन त्या दिनांकाच्या वर्षी घटक बदली झालेल्या घटकात भरती झालेल्या सर्वात कनिष्ठ असलेल्या पोलीस शिपायांच्या खाली निश्चित करण्यात येते" आंतरजिल्हा बदलीवर इतर घटकांतुन हजर झालेल्या पोलीस अंमलदार यांची सेवाजेष्ठता निश्चित करण्यात आलेले आहे.

४) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक पीएमएन-०३१४/२०३/प्र.क्र. ६८/पोल-५ ब दिनांक १० डिसेंबर २०१८ अन्वये निर्गमित केलेले शुद्धीपत्रकात "राज्य राखीव पोलीस बलातुन जिल्हा पोलीस दल/ इतर घटकात विनंतीवरुन बदलून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता निश्चित करतांना संबंधीत राज्य राखीव पोलीस बलाच्या कर्मचाऱ्याचे भरती वर्ष प्रमाण मानले जाईल व राज्य राखीव पोलीस बलातील बदलुन जाणारा कर्मचारी ज्या वर्षी राज्य राखीव बलात भरती झाला असेल त्या वर्षातील जिल्हा पोलीस भरती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे सर्वात शेवाटी त्याला सेवाजेष्ठता दिली जाईल व त्या वर्षात त्याच्या प्रवर्गातील कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदावर तो नियुक्तीस पात्र राहिल." नुसार राज्य राखीव पोलीस बल यांचे आस्थापनेवरुन हजर झालेल्या पोलीस अंमलदार यांची सेवाजेष्ठता निश्चित करण्यात आलेले आहे.

सदरची तात्पुरती **(Provisional)** सेवाजेष्ठतासुची सर्व संबधीत पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे पोलीस ठाणे / शाखेच्या नेमणुकीस असलेल्या सर्व संबधीत पोलीस अंमलदार यांच्या निदर्शनास आणुन द्यावी. तात्पुरत्या **(Provisional)** जेष्ठतासुचीमध्ये त्यांच्या नावासमोर असलेल्या रकाना क्र. १ ते १३ मधील सर्व माहिती तपासुन ( नाव, जन्म तारीख, सैवेत दाखल तारीख, सेवानिवृत्ती दिनांक, पोना / पोहवा/ सपोउपनिरी पदोन्नती दिनांक, सध्याची नेमणुक, बदलुन आलेले घटक व बदलुन आल्याची तारीख ) त्यात काही दुरुस्ती असल्यास योग्य पुराव्यांसह त्यांची अभिवेदने / आक्षेप / हरकती, पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांच्या अभिप्रायांसह या कार्यालयास सदरची तात्पुरती **(Provisional)** जेष्ठतासुची प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात सादर करावीत. सदर मुदतीनंतर

**(कृ.मा.प.)**

प्राप्त झालेल्या हरकतींचा / आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच, सर्व माहिती अचुक असल्यास त्यांच्याकडुन रकाना क्र. १ ते १३ मधील नोंद बरोबर असल्याबाबतची लेखी पोच घेऊन तसे या कार्यालयास दिनांक १५-०९-२०२१ पर्यंत कळवावे.

सर्व प्रभारी पोलीस ठाणे / शाखा अधिकारी यांनी वरीलप्रमाणे आवश्यक ती सर्व कार्यवाही करुन त्याची परिपुर्ण माहिती या कार्यालयास पुढील १५ दिवसांचे आत सादर करावी. त्यानंतर अंतिम जेष्ठतायादी निर्गमित करण्यात येईल. अंतिम जेष्ठतायादी निर्गमित केल्यानंतर नोंदी बदलण्याबाबतचे कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

30/08/21

**मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई**
**यांचे आदेशाने**

**( अभिजीत शिवथरे )**
**पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)**
**नवी मुंबई**

**प्रति,**

पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ वाशी नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२ पनवेल नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पोलीस उप आयुक्त (विशेष शाखा)
पोलीस उप आयुक्त (वाहतुक शाखा) नवी मुंबई
सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
सर्व प्रभारी पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी नवी मुंबई.
राखीव पोलीस निरीक्षक (मुख्यालय) नवी मुंबई.
पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नवी मुंबई.

**प्रत,**

१. सहाय्यक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश विभाग नवी मुंबई (संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता)
२. पोलीस नोटीस प्रसिद्धीसाठी

ACPW
PWI
PWSIE
PWSIE
PWSI (T)
IN NO : 098/2021
DATE 01/09/2021